डॉ. मोहन ना. आमृळे
संचालक, क्रीडा व शारीरिक शिक्षण
**Website : www.mu.ac.in**
**E-mail Id : sports.mudept@gmail.com**

मुंबई विद्यापीठ

विद्यापीठ क्रीडा संकुल,
मरीन लाईन्स, मुंबई – ४०० ०२०
दुरध्वनी क्र.: २२८२६०२७ /२२८१७६९८
क्र. क्रीडा : १९४ /२०१९–२०
दिनांक : ३०/०५/२०२०

प्रति,
मा. प्राचार्य/संचालक,
सर्व संलग्नित महाविद्यालये/संस्था,
मुंबई विद्यापीठ.

:परिपत्रक:

**विषय:– महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम – २०१६ कलम ५७ (१) नुसार मुंबई विद्यापीठ क्रीडा मंडळ नियम पुस्तिकेचा मसुदा.**

महोदय/महोदया,

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम – २०१६ कलम ५७ (१) नुसार क्रीडा संस्कृतीच्या प्रचालनासाठी आणि खेळांशी संबंधित कार्यक्रमांकडे लक्ष देण्यासाठी तसेच मुंबई विद्यापीठांतर्गत असलेल्या महाविद्यालयांची व्याप्ती लक्षात घेता खेळाडूंना स्थानिक स्पर्धेमध्ये भाग घेता यावा, स्पर्धेचा आर्थिक भार व प्रवासाचा त्रास कमी करण्याच्या दृष्टीने सन २०२०–२१ या शैक्षणिक वर्षापासून सर्व आंतर महाविद्यालयीन स्पर्धांचे आयोजन संबधित चार विभागामध्ये करण्याची परवानगी मा. कुलगुरु यांनी दिली आहे. या संदर्भातील सर्व प्रक्रीयांची नियमावली व कार्यपध्द्तीसह ''**मुंबई विद्यापीठ क्रीडा मंडळ नियम पुस्तिका**'' हि (कोविड–१९) लॉकडॉऊन च्या कालावधीत तयार करण्यात आली असून सदर नियम पुस्तिकेचा मसुदा सोबत जोडला आहे.

आपणांस कळविण्यात येते की, आपल्या महाविद्यालयांतील क्रीडा संचालक/क्रीडा शिक्षक/क्रीडा प्रमुख यांनी **''मुंबई विद्यापीठ क्रीडा मंडळ नियम पुस्तिका''** संदर्भात सुचना, शंका व अभिप्राय दिनांक ३० जून, २०२० पर्यंत क्रीडा विभागाच्या Email Id – sports.mudept@gmail.com या ईमेल आयडी वर पाठविणे.

सदर सुचना, शंका व अभिप्राय याबाबत आगामी होणाऱ्या कार्यशाळेमध्ये चर्चा/विचार विनिमय करुन अंतिम मसुदा विद्यापीठ क्रीडा मंडळ (Board of Sports) बैठकीत मंजूरीकरीता सादर करण्यात येईल.

तसेच यासंदर्भातील सविस्तर माहिती, मार्गदर्शक सुचना व आगामी होणाऱ्या कार्यशाळेचे (Workshop) ठिकाण व कालावधी आपणांस (कोविड–१९) लॉकडॉऊन संपल्यानंतर कळविण्यात येईल.

धन्यवाद!

**सही/–** दि. ३० मे, २०२०
**(डॉ. मोहन ना. आमृळे)**
**संचालक,**
**क्रीडा व शारीरिक शिक्षण**